नि.दिवाणी दावा क्र.०७/२०१९
अनुसया वि. शासन
वादीतर्फे सा.क्र.६ (नि.क्र.११६)

**वादीतर्फे उर्वरीत सरतपासत श्री.डी.ए.साबणे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**०२.** नि.क्र.५५/११ लगतचा कागद आता मला दाखवला, तो मा.सह शिक्षण संचालक, नांदेड यांना आमच्या कॉलेजने पाठविलेले पत्र आहे. तत्कालीन मुख्याध्यापक के.पी. बिरादार यांची सही आहे. पत्रातील मजकुर बरोबर आहे. पत्राची स्थळप्रत आमच्या कार्यालयात उपलब्ध नाही. पत्राची तारीख ०९/०७/२००४ अशी आहे. (पत्रास निशाणी देण्यास हरकत घेण्यात आली, की सदरील पत्र मुळ नाही, आणि सही-शिक्क्याची नक्कलही नाही. त्यामुळे, त्यास पडताळणी करून घेतली असे दाखवणारा पुरावा नाही. सदरील आक्षेप विचारात घेवून या पत्राच्या अनुषंगाने त्याची कायदेशीरता ही अंतीम निकालात ठरवण्यात येईल.) सदर पत्रास त्या अनुषंगाने **नि.क्र.१२०** देण्यात येते. त्या पत्राच्या अनुषंगाने आम्ही मोहनराव जगताप यांच्याकडे चौकशी केली. चौकशीमध्ये त्यांच्या गावातील लोकांचे जबाब आम्ही घेतले नाहीत. त्यांच्याकडून निश्चित माहिती न आल्याने त्यांचे निवृत्तीवेतन एक वर्षासाठी आम्ही अदा केले नव्हते, याबद्दल मला सांगता येणार नाही.नि.क्र.१२० या पत्राचे उत्तर सह संचालक यांच्याकडून आले नाही. दि.२२/०४/२०१८ रोजी मोहनराव मयत झाले. दि.०४/०६/२०१८ रोजी जनाबाई यांनी आमच्या कार्यालयात कुंटूंब निवृत्तीवेतन प्रस्ताव पाठवण्याबाबत अर्ज केला. दि.११/०६/२०१८ रोजी अनुसयाबाई यांनी अशाच स्वरुपाचा अर्ज दिला. अर्ज आल्यानंतर एक दोन दिवसांत आम्ही त्याच्यावर आदेश करतो. पेन्शनबाबतचे अर्ज आम्ही सहसंचालक नांदेड ते अकाउंट जनरल नागपूर यांच्याकडे पाठवतो. एक दोन दिवसांमध्ये प्रस्ताव तयार करुन आम्ही पाठवत असतो. असा प्रस्ताव पाठवल्याची नोंद दि.०४/०६/२०१८ रोजीची आमच्याकडे आहे. त्याचा जा.क्र.एस.एम.यु.२०१८-१९/३४१३ असा आहे. सदर प्रस्ताव कधी मंजूर झाला याचे अभिलेख कार्यालयात उपलब्ध नाहीत. मोहनराव जगताप प्रबंधक असल्याने त्यांनी बरेच कागदपत्र कार्यालयातून स्वत:सोबत नेले. जे कागदपत्र शिल्लक राहिले ते मी आजरोजी आणलेले आहेत. त्यांनी बरीचशी कागदपत्रे स्वत:सोबत नेली आहेत, हे या दाव्याचे समन्स मला आल्यानंतर अभिलेख पाहिल्यानंतर मला कळले.

**०३.** नि.क्र.१२० मधील दुसरा भाग आता मला दाखवला. आमच्या कार्यालयाने मोहनराव जगताप यांना त्यांनी फाईल गहाळ केली म्हणून पत्र पाठवले होते. त्याचा तो दस्त आहे. त्याची स्थळप्रत मी आजरोजी आणली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर के.पी. बिरादार यांची सही आहे, ती मी ओळखतो. या अर्जाला मोहनराव यांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही. याबद्दल त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई आमच्या संस्थेने केलेली नाही. नांदेड सहसंचालक यांनी पुढे आमचा प्रस्ताव नागपूरला कधी पाठवला याची नोंद आमच्याकडे नाही. दोन व्यक्ती मोहनराव यांच्या पत्नी आहेत या अनुषंगाने दोघींचे आलेले अर्ज विचारात घेता त्याची चौकशी करावी या अनुषंगाने तत्कालीन प्राचार्यांनी कोणतेही अभिलेख तयार केल्याचे आमच्या अभिलेखात नाही. अशा प्रकारच्या परिस्थितीत न्यायालयीन वारसा दाखला हा सर्वोत्तम पुरावा आहे असे म्हणता येईल. जनाबाईने सक्षम न्यायालयाचा दाखला दिलेला नाही.

**०४.** नि.क्र.५५/१६ लगतचे पत्र आता मला दाखवले. दि.१०/०७/२०१८ रोजी अकाउंट जनरल, नागपूर यांच्याकडून सहसंचालक नांदेड यांना जे पत्र आले, त्याच्याप्रमाणे नांदेड ऑफीसने आम्हाला दि.१०/०७/२०१८ रोजी एक पत्र दिले. त्या पत्रान्वये मोहनराव यांना दोन पत्नी असल्याने त्याबद्दल आवश्यक चौकशी करावी असे आम्हाला कळविण्यात आले. त्याचे मुळ पत्र मी आजरोजी आणले आहे. त्याची एक प्रत सुरेखा उर्फ अनुसया यांना दिलेली आहे. आता मला ती दाखविली, ती तिच आहे. त्याखाली लेखाअधिकारी यांचे पदनाम नमूद आहे. सदरचे पत्र शासकीय अधिकाऱ्याकरवी त्यांच्या कर्तव्याचा भाग म्हणून त्यांनी पाठवले असल्याने आणि पत्राखाली त्यांचे पदनाम असल्याने अधिकृत दस्तावेज म्हणून तो समजण्यात येतो. त्यास **नि.क्र.१२१** देण्यात येते. या पत्राच्या अनुषंगाने सक्षम अधिकारी चौकशी करण्याकरीता आम्ही नेमला नाही. त्या अनुषंगाने आम्ही चौकशी केलेली नाही.

**०५.** आता मला नि.क्र.५५/१७ लगतचे दि.०३/०९/२०१८ रोजीचे पत्र दाखवले. ते आम्ही महालेखाकार, निवृत्तीवेतन शाखा, नागपूर यांना पाठवलेले आहे. एस.व्ही.जगताप प्राचार्य यांची त्यावर सही आहे, ती मी ओळखतो. त्याची

स्थळप्रत मी आणली आहे. नि.क्र.५५/१७ मधील मजकूर स्थळप्रतीप्रमाणे बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२२** देण्यात येते. पेन्शन थांबवण्याबाबतचे ते पत्र आहे. या पत्राच्या संदर्भाने महालेखाकार यांनी आमच्या कॉलेजला पत्र दि.२४/०९/२०१८ रोजी पाठवले. त्याची प्रत आमच्या कार्यालयात उपलब्ध नाही. या पत्राची कोणतीही प्रत आमच्याकडे उपलब्ध नाही. या पत्राची एक प्रत वादीला आल्याचे दिसते.

**०६.** जनाबाईची पेन्शन महालेखाकार, नागपूर यांनी मंजूर केली. जनाबाई यांना पेन्शन लागू करण्याचे कारण म्हणजे चालू दाव्यामधील ताकीद अर्ज नामंजूर झाला, असे कारण महालेखाकार यांनी दि.२४/०६/२०२० च्या पत्रात नमूद केले, म्हणून जनाबाईना पेन्शन चालू झाली. त्याची साक्षार्कीत प्रत मी सादर करु शकतो. मुळप्रत आमच्या अभिलेखाचा भाग असल्यामुळे मी दाखल करु शकत नाही. सदर पत्रास **नि.क्र.१२५** देण्यात येते. सदर ताकीद अर्जाचा आदेश मी पाहिला नाही. जी प्रक्रिया राबवायची ती प्रक्रिया न राबवता सदर पेन्शन बेकायदेशीरपणे सुरु करण्यात आली असे म्हणता येत नाही.

सरतपास पुर्ण.

**न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**

**दिनांक ०६/१०/२०२५.**